# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**मध्यवर्ती कार्यालय, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबईसेंट्रल (पु) मुंबई - ४०० ००८**

**जाहिरात क्र. २/२०१५ सरळसेवा भरती अधिकारी वर्ग-१ व वर्ग-२ पदे**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील खाली नमुद केल्याप्रमाणे अधिकारी वर्ग-१ व वर्ग-२ पदातील अनुशेष व आरक्षणानुसार रिक्त जागा भरण्यासाठी उमेदवारांकडून ऑन लाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१) रिक्त पदांचा तपशील:**

| गट | अ. क्र. | सांकेतांक क्रमांक | पदाचे नांव | रिक्त पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ जा | अ ज | वि.जा.व भ.ज. | | | | विमा प्र | इमा व | खुला | एकुण |
| | | | | | | अ | ब | क | ड | | | | |
| | **अ)** | | **वर्ग-१** | | | | | | | | | | |
| अतांत्रिक | १ | ०१ | परिव्यय लेखांकन अधिकारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अतांत्रिक | २ | ०२ | संयुक्त मुख्य वैद्यकीय अधिकारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| | **ब)** | | **वर्ग-२ (वरिष्ठ)(कनिष्ठस्तर)** | | | | | | | | | | |
| अतांत्रिक | १ | ०३ | विभागीय वाहतूक अधिकारी/ आगार व्यवस्थापक (वरिष्ठ) (वाहतूक) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| तांत्रिक | २ | ०४ | उप यंत्र अभियंता/ आगार व्यवस्थापक(वरिष्ठ)(यांत्रिक) | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| अतांत्रिक | ३ | ०५ | लेखा अधिकारी/ लेखा परिक्षण अधिकारी | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | एकूण | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ५ |
| | **क)** | | **वर्ग-२(कनिष्ठ)(कनिष्ठस्तर)** | | | | | | | | | | |
| अतांत्रिक | १ | ०६ | विभागीय वाहतूक अधिक्षक/ आगार व्यवस्थापक (वाहतूक) | ० | ३ | १ | १ | ० | १ | १ | १ | ४ | १२ |
| तांत्रिक | २ | ०७ | सहाय्यक यंत्र अभियंता/ आगार व्यवस्थापक(यांत्रिक) | २ | ४ | ० | ० | ० | ० | ० | २ | १२ | २० |
| अतांत्रिक | ३ | ०८ | सहाय्यक/विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ५ |
| अतांत्रिक | ४ | ०९ | सहाय्यक/विभागीय लेखा अधिकारी | १ | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ३ |
| तांत्रिक | ५ | १० | सहाय्यक/विभागीय भांडार अधिकारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ | ५ |
| तांत्रिक | ६ | ११ | विभागीय अभियंता(स्थापत्य) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| अतांत्रिक | ७ | १२ | विभागीय सांख्यिकी अधिकारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ४* |
| अतांत्रिक | ८ | १३ | कामगार अधिकारी | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | १ | ५ |
| अतांत्रिक | ९ | १४ | विधि अधिकारी | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ५ |
| तांत्रिक | १० | १५ | सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| तांत्रिक | ११ | १६ | विभागीय अभियंता(विद्युत) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| अतांत्रिक | १२ | १७ | सुरक्षा व दक्षता अधिकारी | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ४ |
| | | | एकूण | ६ | १० | १ | ३ | ० | २ | २ | ७ | ३६ | ६७ |
| | | | एकूण (अ+ब+क) | ६ | ११ | २ | ३ | ० | २ | २ | ७ | ४१ | ७४ |

* अपंगाचे आरक्षण = विभागीय सांख्यिकी अधिकारी या पदात १ जागा श्रवण शक्तीतील दोष या अपंगत्वाकरिता राखीव असून कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

**२) समांतर आरक्षण :**

अ) महिलांसाठी आरक्षण: शासन नियमानुसार एकूण पदाच्या ३०% इतके समांतर आरक्षण राहील.

ब) खेळाडू आरक्षण: आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंकरिता ५% आरक्षण राहील.

उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील. तसेच समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या-त्या आरक्षणाच्या गटातून भरण्यात येईल.

**३) उपरोक्त पदांकरिता वेतनश्रेणी व आवश्यक शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती**

| सांकेतांक क्रमांक | पदाचे नांव | **शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती** |
|---|---|---|
| **(अ)** | **वर्ग-१** | |
| ०१ | परिव्यय लेखांकन अधिकारी वेतनश्रेणी:<br>रु.२०८८०-४३७३७ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकी मधील (Mech./Auto.) पदवी + AICWA. या अर्हतेप्रमाणे पुरेसे अर्ज प्राप्त झाले नाही तर वाणिज्य/विज्ञान या मधील पदवीसह AICWA या शैक्षणिक अर्हतेचा विचार करण्यात येईल.<br>२) अनुभव - परिव्यय लेखांकन विषयात अर्हता प्राप्त केल्यानंतर नावाजलेल्या कारखान्यातील परिव्यय हिशोबासंबंधीचा तीन वर्षांचा अनुभव.<br>३)वयोमर्यादा - ३५ वर्षे, मागासवर्गीय उमेदवारास शासन निर्णयानुसार पाच वर्ष शिथीलक्षम. |
| ०२ | संयुक्त मुख्य वैद्यकीय अधिकारी<br>वेतनश्रेणी: रु. १७४००-४२२५६ | (१) वैद्यक पारंगत (वैद्यशास्त्र) [M.D.(Medicine)]<br>(२) अनुभव : पदवीनंतर एकूण ५ वर्षाचा व्यावसायीक अनुभव<br>(३) वयोमर्यादा : ४० वर्षे. |
| **(ब)** | **वर्ग-२(वरिष्ठ)(कनिष्ठस्तर)** | |
| ०३ | विभागीय वाहतूक अधिकारी/ आगार व्यवस्थापक (वाहतूक)(वरिष्ठ)<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी:<br>रु.८८८०-११९३९<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी:<br>रु.१४८८०-३६१४१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पद्व्युत्तर पदवी.<br>२) निवड झालेल्या उमेदवारांना वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त करावा लागेल. |
| ०४ | उप यंत्र अभियंता/ आगार व्यवस्थापक(यांत्रिक)(वरिष्ठ)<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी:<br>रु.८८८०-११९३९<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी:<br>रु.१४८८०-३६१४१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची अभियांत्रिकीमधील ऑटोमोबाईल/ प्रॉडक्शन/ मेकॅनिकल या शाखेची पदवी /पद्व्युत्तर पदवी<br>२) निवड झालेल्या उमेदवारांना वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त करावा लागेल. |
| ०५ | लेखा अधिकारी/लेखा परिक्षण अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी:<br>रु.८८८०-११९३९<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी:<br>रु.१४८८०-३६१४१ | १) ॲडव्हान्स्ड अकौटन्सी या प्रमुख विषयासहीत मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी +पद्व्युत्तर पदवी (कोणत्याही शाखेतील).<br>२) शासकीय किंवा ख्यातनाम व्यवसाय संस्थेतील लेखा परिक्षेचा पर्यवेक्षक म्हणून निदान ५ वर्षाचा अनुभव<br>३) वयोमर्यादा : ४० वर्षे, मागासवर्गीय उमेदवारास पाच वर्षे शिथिलक्षम |
| **(क)** | **वर्ग-२(कनिष्ठ)(कनिष्ठस्तर)** | |
| ०६ | विभागीय वाहतूक अधिक्षक/ आगार व्यवस्थापक (वाहतूक)<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी:<br>रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी:<br>रु.१२९७०-३१५०३ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी / पदव् पदवी<br>२) निवड झालेल्या उमेदवारांना वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त करावा लागेल. |
| ०७ | सहाय्यक यंत्र अभियंता/ आगार व्यवस्थापक(यांत्रिक)<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी:<br>रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी:<br>रु.१२९७०-३१५०३ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकीमधील ॲटोमोबाइ प्रॉडक्शन/ मॅकॅनिकल या शाखेतील पदवी.<br>२) निवड झालेल्या उमेदवारांना वाहन चालविण्याचा परवाना प्र करावा लागेल. |

| सांकेतांक क्रमांक | पदाचे नांव | **शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती** |
|---|---|---|
| ०८ | सहाय्यक/विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची/ संस्थेची व्यवसाय प्रशासन(MBA)/ कर्मचारीवर्ग व्यवस्थापन(MPM)/ समाजकार्य व्यवस्थापन (MSW) (कामगार कल्याण व कर्मचारीवर्ग व्यवस्थापन या प्रमुख विषयासह) पद्व्युत्तर पदवी. |
| ०९ | सहाय्यक/विभागीय लेखा अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी. |
| १० | सहाय्यक/विभागीय भांडार अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी मधील ॲटोमोबाईल, प्रॉडक्शन शाखेतील पदवी / पदव्युत्तर पदवी |
| ११ | विभागीय अभियंता(स्थापत्य)<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी/ पद्व्युत्तर पदवी<br>२) कोणत्याही प्रतिष्ठीत व्यावसायीक संस्थेतील स्थापत्य इमारत बांधकाम, देखभाल व रस्ते बांधणीच्या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| १२ | विभागीय सांख्यिकी अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Statistics या मुख्य विषयासह) पद्व्युत्तर पदवी. |
| १३ | कामगार अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | मान्यता प्राप्त विद्यापिठाची / संस्थेची समाजकार्य व्यवस्थापन (MSW / MLW) (कामगार कल्याण व समाज कल्याण विषयासह) किंवा कामगार विज्ञान (MLS) पदव्युत्तर पदवी |
| १४ | विधी अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कायदेविषयक पदवी.<br>२) न्यायालयामधील किमान ३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव/ सनद आवश्यक<br>३) कारखाने अधिनियम, किमान वेतन अधिनियम, औद्योगिक विवाद अधिनियम, वेतन प्रदान अधिनियम, व त्या स्वरुपाचे इतर कामगार कायदे यांचे विशेष ज्ञान. |
| १५ | सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | १)मान्यता प्राप्त विद्यापिठाची वास्तुशास्त्रसंबंधी पदवी (Architecture) + वास्तुशास्त्र कार्यालयातील किंवा शासकीय अथवा निमशासकीय संस्थेतील वास्तुशास्त्रज्ञ म्हणून किमान २ वर्षाचा कार्यालयीन अनुभव आवश्यक<br>**किंवा**<br>महाराष्ट्र शासनाची वास्तुशास्त्रसंबंधी पदविका किंवा त्या शासनाने मान्य केलेली कोणतीही समकक्ष अर्हता + वास्तुशास्त्र कार्यालयातील किंवा शासकीय, निमशासकीय संस्थेतील वास्तुशास्त्रज्ञसंबंधी कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>२)वास्तुशास्त्रज्ञ परिषद दिल्ली येथील सभासद नोंदणी आवश्यक<br>**वयोमर्यादा :** ३५ वर्षे, मागासवर्गीय उमेदवारास पाच वर्षे शिथिलक्षम. |
| १६ | विभागीय अभियंता(विद्युत)<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी / पद्व्युत्तर पदवी प्रकाश योजना व विज संच मांडणीचा अनुभव आवश्यक |

| सांकेतांक क्रमांक | पदाचे नांव | **शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती** |
|---|---|---|
| १७ | सुरक्षा व दक्षता अधिकारी<br>अ) प्रथम २ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.७७५०-१०४२१<br>ब) २ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.१२९७०-३१५०३ | १) कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी / पद्युत्तर पदवी किंवा औद्योगिक सुरक्षा कोर्स<br>२) निकोप प्रकृती असावी. ३) किमान उंची १६७ सें.मी.(५फूट ६ इंच) महिला उमेदवाराबाबत (५ फूट ३ इंचापेक्षा कमी नसावी) आवश्यक ४) कोणत्याही औद्योगिक व्यावसाय संस्थेच्या किंवा सरकारी सुरक्षा शाखेतील पर्यवेक्षकीय किंवा त्यावरील संवर्गात किमान २ वर्षे नोकरी केली असल्यास किंवा माजी सैनिक असल्यास प्राधान्य. |

**४) अधिकारी पदासाठी इतर अटी व शर्ती :**

**(अ)** <u>वयोमर्यादा</u> **:-** सांकेतांक क्रमांक १, २, ५, व १५ व्यतिरिक्त इतर पदांसाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या दि. ०२.०१.२०१६ या अंतिम तारखेपर्यंत किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. उर्वरीत पदांसाठी वयोमर्यादा जाहिरातीमध्ये नमुद करण्यात आली आहे. शासकीय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथीलक्षम राहील. रा.प.कर्मचाऱ्यांना वयाची अट लागू नाही.

**(ब) <u>लेखी परिक्षा</u>** :- शासन निर्णयानुसार गट-ब (अराजपत्रीत) म्हणजे रा.प. महामंडळातील वर्ग -२ (वरिष्ठ) व (कनिष्ठ) या पदासाठी सरळ सेवेने पदे भरताना मौखीक परिक्षा (मुलाखत) न घेण्याबाबत निर्गमीत करण्यात आलेल्या निर्णयानुसार फक्त लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेतील गुणवत्तेच्या आधारे सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन उमेदवारांची निवड वर्ग-२ (वरिष्ठ) व (कनिष्ठ) पदाकरीता कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरण्याच्या अधिन राहून निवड करण्यात येईल. उर्वरीत सांकेतांक क्र १ या पदासाठी लेखी परिक्षेतील गुणानुक्रमानुसार तसेच साकेतांक पद क्रमांक २ साठी लेखी परिक्षा न घेता केवळ कागद पत्र पडताळणी करुन घोषित जागांच्या १:५ प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मात्र सांकेतीक क्रमांक १७ सुरक्षा व दक्षता अधिकारी या पदाकरिता शारिरीक पात्रतेचे निकष असल्यामुळे लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणानुसार गुणांनुक्रमे, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार १:५ प्रमाणात प्रथम शारिरीक पात्रतेसाठी बोलविण्यात येईल तद्नंतर शरिरीक चाचणीत पात्र झालेल्या उमेदवारांची गुणांनुक्रमे, सामाजीक व समांतर आरक्षणानुसार कागद पत्रांची पडताळणीमध्ये पात्र ठरण्याच्या अधिन राहून निवड करण्यात येईल.

जाहिरातीमध्ये व रिक्त जागांमध्ये उचित बदल करणे, आवश्यकता वाटल्यास जाहिरात पूर्णपणे अथवा अंशत: रद्द करणे, निरनिराळया पदांकरिता प्रशिक्षण कालावधी विद्यावेतन निश्चित करणे यामध्ये आवश्यकता वाटल्यास उचित बदल करण्याचे अधिकार महामंडळास राहतील उमेदवारांच्या निवड प्रक्रिये मध्ये बदल करावयाचे कायदेशिर अधिकार महामंडळास राहतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी

**(क)** सर्व पदांकरिता उमेदवारांना मराठी बोलता, लिहीता व वाचता येणे आवश्यक.

**(ड)** सर्व पदांकरिता उमदेवारांना MSCIT किंवा समकक्ष संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण प्रमाण पत्र असणे आवश्यक.

**(इ)** वरील सर्व अर्हता ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

**(५) उमेदवारांची निवड व नेमणूक :-**

**अ)** (१) लेखी परिक्षेचे स्वरुप वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी राहिल. सांकेतांक क्र.०१ ते १७ करिता लेखी परिक्षा राहील.

**लेखी परिक्षा -** तांत्रिक व अतांत्रिक प्रवर्गातील उमेदवारांसाठी २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल, त्याकरीता मराठी, इंग्रजी, सामाज्ञ ज्ञान, व बैधिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण राहतील, या प्रमाणे २०० गुणांसाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेचा कालावधी १ तास ३० मिनिट (९० मिनिट) असेल, वरील परीक्षेची प्रश्न पत्रीका हया बहुपर्यायी उत्तर असलेल्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या असतील. प्रत्येक प्रश्नास अधिका अधिका २ गुण ठेवण्यात येतील.

(२) लेखी परिक्षा उत्तीर्णतेसाठी किमान ३५% गुण आवश्यक. पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३०% गुणांपर्यंत शिथिलक्षम.

**ब)** सांकेतांक क्रमांक - १ पदाकरीता उमेदवारांना लेखी परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार व सांकेतांक क्रमांक २ यापदाकरीता शैक्षणीक अहर्ततेमधील गुणानुसार गुणानुक्रमे १:५ प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. उर्वरीत वर्ग-२ (वरिष्ठ) व (कनिष्ठ) पदातील उमेदवारांची केवळ लेखी परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणानुसार गुणांनुक्रमे व सामाजीक व समांतर आरक्षणानुसार मुलाखत न घेता निवड करण्यात येईल. निवड केलेल्या उमेदवारांना एक वर्ष कालावधीत प्रशिक्षणार्थी म्हणून निवड झालेल्या पदाचे सेवापूर्व प्रशिक्षण दिले जाईल.

**क)** एक वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीपैकी पहिल्या सहा महिन्याकरीता ज्या पदाकरीता त्याची निवड झाली आहे त्या पदाचे किमान मूळ वेतन (निम्नस्तर) विद्यावेतन म्हणून देय राहील व पुढील सहा महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये सदर पदाचे मूळ वेतन (निम्नस्तर) + अनुज्ञेय महागाई भत्ता विद्यावेतन म्हणून देय राहील. सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये क्लासरुम प्रशिक्षणासह प्रत्यक्ष कामाच्या प्रशिक्षणाचा (On the job Training) समावेश असेल.

**ड)** निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळात प्रशिक्षण कालावधी सह किमान ५ वर्षे सेवा करणेबाबत हमी रु.१००/- किंमत असलेल्या मुद्रांकपत्रावर महामंडळाने विहित केलेल्या प्रारुपात करारनामा करुन द्यावा लागेल. उमेदवाराने करार कालावधीच्या मुदतीपूर्वी नोकरी सोडल्यास करारात नमूद केलेली रक्कम रू.७०,०००/- (रू.सत्तर हजार फक्त) वसुल करण्यात येईल.

१. निवड झालेल्या उमेदवारांची रा.प.महामंडळातील कोणत्याही विभाग / घटकात / प्रदेशात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा रा.प.महामंडळाच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल.
२. विभागीय वाहतूक अधिकारी/ आगार व्यवस्थापक(वाहतूक)(वरिष्ठ),आगार व्यवस्थापक (यांत्रिक)(वरिष्ठ)/ उप यंत्र अभियंता, आगार व्यवस्थापक (वाहतूक)/विभा.वाहतूक अधीक्षक व आगार व्यवस्थापक (यांत्रिक)/ सहा.यंत्र अभियंता या पदातील निवड झालेल्या उमेदवारांना विहीत मुदतीत अवजड वाहन चालन परवाना प्राप्त करावा लागेल.

**इ)** एक वर्षाचे नेमणूकपूर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना पदनिहाय दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ वेतनश्रेणीत २ वर्षा करीता नेमणूक देण्यात येईल. या कालावधीमध्ये मूळ वेतनासह नियमानुसार अनुज्ञेय असलेले भत्ते मिळतील. परिविक्षा कालावधी एक वर्षाचा राहील. एक वर्षाचा परिविक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना स्थायी करण्यात येईल. उमेदवाराने संबंधीत पदात २ वर्षे (१वर्षे परिविक्षा कालावधी धरुन) समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतर तिस-या वर्षी नियमित वेतनश्रेणीत सामावून घेण्यात येईल.

**ई)** आवश्यकतेनुसार उमेदवारांनी प्रशिक्षण / परिविक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण न केल्यास कालावधी वाढविणे अथवा काम समाधानकारकपणे न आढळल्यास पुढील नेमणूक नाकारण्याचा रा.प. महामंडळास अधिकार राहील.
वर नमूद केलेल्या बाबींमध्ये बदल करावयाचे पूर्ण अधिकार महामंडळास राहतील.

**(६) <u>ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना</u> .**

| अ.क्र. | कार्य क्रम | दिनां व | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन)चलन प्रिंटसहीत करण्याचा कालावधी | दि.०३.१२.२०१५ | ३०.१२.२०१५ रोजी रात्रौ ११.५९ पर्यंत |
| २. | ऑनलाईन पेमेंट डेबिटकार्ड / क्रेडिटकार्ड / नेट बँकींगद्वारे स्विकारण्याचा कालावधी | दि.०३.१२.२०१५ | ३१.१२.२०१५ |
| ३. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | दि.०५.१२.२०१५ | ०२.०१.२०१६ बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ४ | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि. ०२.०१.२०१६ पर्यंत शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेकडून देण्यात आलेला Transaction ID अर्जामध्ये नमुद करुन ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख. | दि. ०२.०१.२०१६ रोजी रात्री ११.५९ पर्यंत | |
| ५ | अर्जामध्ये दुरुस्तीसाठीचा कालावधी, या कालावधीत अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी उमेदवारास एकदाच संधी देण्यात येईल, त्यावेळी उमेदवार अर्जामध्ये दुरुस्ती करु शकतो त्याबाबत सविस्तर सूचना या कालावधीत संकेत स्थळावर उपलब्ध होतील. | दि.०४.०१.२०१६ | ११.०१.२०१६ |
| ६. | ऑनलाईन पेमेंट डेबिट कार्ड / क्रेडिटकार्ड / नेट बँकींगद्वारे चलन भरणा करण्याचा दिनांक(ज्या उमेदवारांनी मागासप्रवर्गातून खुल्या प्रवर्गात बदल | ११.०१.२०१६ | |

| | | |
|---|---|---|
| | केला आहे अशा उमेदवारांसाठी उर्वरित फी भरण्याची अंतिम दिनांक) | |
| ७. | चलन बँकेत भरणा करण्याचा दिनांक (ज्या उमेदवारांनी मागास प्रवर्गातून खुला प्रवर्गात बदल केला आहे अशा उमेदवारांसाठी उर्वरीत फी भरण्याची अंतिम दिनांक) | १३.०१.२०१६ |
| ८. | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक १३.०१.२०१६ पर्यत शुल्क जमा केले असेल त्याचा ऑन लाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | १५.०१.२०१६ रोजी रात्रौ ११.५९ पर्यंत |
| ९. | <u>**भरतीचा प्रस्तावित आराखडा**</u><br>१) लेखी परिक्षा | :<br>फेब्रुवारी, २०१६ |
| | २) लेखी परिक्षेचा निकाल | मार्च, २०१६ |
| | ३) मुलाखत (सांकेतांक क्रमांक-१ व २साठी) | एप्रिल, २०१६ |
| | ४) निवड यादी जाहिर | एप्रिल,२०१६ |
| | ५) प्रशिक्षण व नियुक्ती | मे,२०१६ |

**अर्जाचे भरती प्रक्रिया शुल्क :** भरावयाच्या पदांचे एकुण १७ प्रवर्ग असून त्यांचे पद सांकेतिक क्र.०१ ते १७ असे आहेत. सांकेतांक क्र. २ साठी लेखी परिक्षा नाही. तांत्रिक गटातील पदांचे सांकेतांक क्रमांक ४, ७, १०, ११, १५, व १६ या प्रमाणे आहे. अतांत्रिक गटातील पदांचे सांकेतांक क्रमांक १, २, ३, ५, ६, ८, ९, १२, १३, १४, व १७ याप्रमाणे आहे. तांत्रिकी व अतांत्रिक अशा दोन्ही गटातील पदांसाठी उमेदवार अर्ज करु इच्छित असल्यास प्रत्येक गटासाठी स्वतंत्र फी भरावी लागेल. एखाद्या उमेदवारास एकाच गटातील म्हणजे तांत्रिक किंवा अतांत्रिक यापैकी केवळ एकाच गटातील एका पेक्षा जास्त पदांसाठी इच्छुकता दर्शवावयाची असेल, तर तो प्राधान्य क्रमाद्वारे इच्छुकता दर्शवू शकेल. तथापि, जास्त पदात अर्ज केल्यानंतर त्याप्रमाणे लेखी परिक्षेत जरी उत्तीर्ण उमेदवार झाला तरी प्रत्यक्ष निवड एकाच पदासाठी केली जाईल. याकरीता उमेदवाराने जो प्राधान्य क्रम पहिल्या पदासाठी देण्यात आलेला आहे. तो विचारात घेण्यात येईल. प्रत्येक गटासाठीचे भरती प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गाकरिता रु.५००/- व मागास प्रवर्गाकरिता रु.२५०/- असे राहील. तसेच बँकेचा आकार(Bank Charges) / ऑनलाईन पेमेंट गेटवे चार्जेस रु.५० इतके उमेदवारांने स्वत: भरावयाचा आहे.

**तांत्रिक गटासाठी, अतांत्रिक गटासाठी परिक्षा घेण्यात येतील. उमेदवारांनी विशिष्ट गटातील पदांच्या निवडीचा प्राधान्यक्रम अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक राहील. प्राधान्यक्रमानुसार उमेदवाराची गुणानुक्रमानुसार एकाच पदासाठी निवड करण्यात येईल.**

**७) <u>ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत:</u>**

१. प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

२. उमेदवारानी वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज www.mahast.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

३. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना रा.प.महामंडळ हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

४. उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या

पात्रतेनुसार संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेंच आनलाईन अर्ज भरून सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर व सदर अर्ज ग्राह्य (validate) झाल्यानंतर सदर अर्जातील भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना जाहिरात काळजीपुर्वक वाचून अर्ज भरणे आवश्यक आहे. लेखी परिक्षेचा निकाल उमेदवाराने ऑनलाईन भरताना भरलेल्या माहितीवर आधारीत तयार करण्यात येणार असून चुकीची माहिती भरल्यास निकालामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. अर्ज बिनचूक भरण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

उमेदवाराने अर्ज ऑनलाईन भरताना चुकीची माहिती भरल्यामुळे (उदा.उमेदवाराचे नांव, जात, पुरूष अथवा स्त्री, जन्मतीख इ. बाबतची माहिती) अर्जदाराची झालेली निवड रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही अर्ज अथवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही.

५. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत विहित पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन www.mahast.in या संकेतस्थळावरील सूचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना फोटोची साईज ५ केबी ते १०० केबी असणे आवश्यक आहे. व सहीची साईज ५ केबी ते ५० केबी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी परिक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

६. उमेदवारांची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमदेवारांची निवड निश्‍चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सूचना www.mahast.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

अर्ज भरुन झाल्यानंतर फी भरण्यासाठी खालील प्रमाणे दोन पर्याय उपलब्ध आहेत. यापैकी कोणताही एक पर्याय निवडावा.

I) ऑनलाईन पेमेंट गेटवे.

II) एस. बी. आय. बँक चलन

<u>I) ऑनलाईन पेमेंट गेटवे</u>

१) प्राथमिक माहिती नोंदविणे, फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे,शैक्षणिक पात्रता नोंदवणे.

२) Pay online हा पर्याय निवडा

३) तुमच्या अर्जामध्ये दाखवल्या प्रमाणे फी बरोबर आहे का, ते खात्री करुन घ्यावी. खुल्या प्रवर्गासाठी ₹ ५००/- + ऑनलाईन प्रोसेसिंग फी ₹ ५०/- आणि राखीव प्रवर्गासाठी ₹ २५०/- + ऑनलाईन प्रोसेसिंग फी ₹ ५०/- आहे.

४) जर तुमची फी बरोबर असेल तर Pay online हा पर्याय निवडा.

५) हा पर्याय तुम्हाला payment gatway कडे घेऊन जाईल. तुम्हाला तिथे Credit Card, Debit Card, Netbanking हे पर्याय मिळतील त्यापैकी योग्य पर्याय निवडा.

६) तुमचे Payment पुर्ण झाल्यावर तुम्हाला Online Payment Receipt मिळेल ती Print करुन तुमच्या जवळ जतन करुन ठेवावी.

७) तुमची अर्जाची प्रत तुमच्या लॉगीन मध्ये उपलब्ध होईल ती प्रिंट करुन घ्यावी.

II) एस. बी. आय. बँक चलन

१) उमेदवाराने www.mahast.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती भरल्यानंतर उमेदवारास Application ID सह स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत फी भरण्याचे चलन तीन प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, रा.प.महामंडळाची प्रत आणि बॅंकेची प्रत) उपलब्ध होईल.

२) सदर चलनाची प्रत काढून त्या चलनामार्फत चलनात नमुद असलेली भरती प्रक्रिया शुल्क चलनामध्ये नमुद केलेल्या सुचना नुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरणा करावी व सदर शाखेकडून चलनावर रक्कम जमा झालेबाबत Transaction ID नमूद केला जाईल. चलनाच्या तीन प्रतीपैकी उमेदवारास त्याच्या स्वत:ची प्रत व रा.प.महामंडळाची प्रत शाखेकडून (बँकेकडून) परत देण्यात येईल.

३)त्यानंतर सदर उमेदवारास भरती प्रक्रिया शुल्क जमा झाल्याबाबतचा SMS येईल स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये भरती प्रक्रिया शुल्क जमा केले, म्हणजे लेखी परिक्षेसाठी अर्ज पात्र ठरला असे गृहीत धरण्यात येऊ नये.

४)भरती प्रक्रिया शुल्क जमा झाल्याबाबतचा SMS आल्यानंतर उमेदवाराने त्याला मिळालेल्या Application ID वरुन आपला प्राथमिक अर्ज पुन्हा उघडून अर्जातील उर्वरित माहिती तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखेकडून देण्यात आलेला Transaction ID नमूद करुन अर्ज सबमीट करावा. त्यानंतर उमेदवाराने सदर अर्जाची प्रिंट काढावी. सदर अर्जाची प्रत व चलन भरल्याची रा.प. महामंडळाची प्रत कागदपत्र छाननीचे वेळी रा.प.महामंडळाकडे जमा करणे बंधनकारक राहील. सदर अर्जाची व चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी केली जाणार नाहीत.

८. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरलेनंतर त्याची स्थिती www.mahast.inया संकेतस्थळावर पाहता येऊ शकेल.

९. उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये उमेदवारास काही दुरूस्ती करावयाची असल्यास (उदा. उमेदवाराचे नांव, जात, पुरूष अथवा स्त्री, मोबाईल क्र., जन्मतारीख या सारख्या) उमेदवार संकेतस्थळावर दिनांक ०४.०१.२०१६ ते ११.०१.२०१६ या कालावधीत दुरूस्ती करू शकतो. सदर दुरूस्तीची संधी उमेदवारास या कालावधीत फक्त एकदाच देण्यात येणार आहे. यानुसार उमेदवार अर्जामध्ये दुरूस्ती करू शकतो. याकरीता उमेदवारास वेळोवेळी संकेतस्थळावर तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबतची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. सदर कालावधी संपल्यानंतर उमेदवारास अर्जामधे कोणताही बदल करता येणार नाही.

१०. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित भरती प्रक्रिया शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती/ परिक्षा प्रवेशपत्र/ वेळापत्रक/परिक्षा केंद्र/ बैठक क्रमांक तसेच मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांना मुलाखतीची तारीख वेळ व ठिकाण इत्यादीबाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच एस.एम.एस. व ई-मेलद्वारे सुचित करण्यात येईल. अन्य कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

११. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर www.mahast.in या संकेतस्थळावरुन परिक्षेचे प्रवेशपत्र विहित नमूद कालावधीत डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परिक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

१२. उमेदवाराच्या मदत व माहितीकरिता संस्थेचा दूरध्वनी क्रमांक ७७७४०६०९०१ या प्रमाणे आहे. सदरहू दुरध्वनी क्रमांक कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

१३. उमेदवाराने अर्जासोबत लहान कुटुंबाची माहिती भरणे अनिवार्य राहील.

## (८) <u>महत्वाच्या सूचना</u> : –

**१.** i)उमेदवारास लेखी परिक्षेची तारीख, वेळ व ठिकाण इत्यादीबाबतची माहिती SMS व संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

ii) लेखी परिक्षा / शारिरीकक्षमता चाचणी पक्रिये दरम्यान उमेदवारास शारिरीक दुखापत झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस रा.प.महामंडळ जबाबदार राहणार नाही.

**२.** लेखी परिक्षेतील गुणानुक्रमे व सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून प्राथमिक छाननीकरीता (कागदपत्र पडताळणी व शारिरीक अर्हता तपासणी) पात्र झालेल्या उमेदवारांची नावे महामंडळाच्या www.mahast.in या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येतील.

**३.** संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे व शारिरीक पात्रता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या केवळ गुणांच्या आधारे उमेदवारांला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवार उपरोक्त नमूद केलेल्या विगतवारीच्या निकषानुसार व कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर सांकेतांक क्रमांक-१ मधील

उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरत असल्यासच गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल. उर्वरीत वर्ग-२ (वरिष्ठ) व (कनिष्ठ) पदांसाठी उमेदवारांची निवड करताना कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरण्याच्या आधिन राहून निवड करण्यात येईल.

४. उमेदवार अर्ज केलेल्या पदासाठीची विहित अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे आढळून आल्यास त्याचा/तिचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल.

५. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

६. शासकीय,निमशासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्या सेवेतील कर्मचा-याने वर नमूद केलेल्या पदांकरीता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचा-याला खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. रा.प.महामंडळातील कर्मचा-याची निवड व नेमणूक झाल्यास त्याचे रा.प.नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल.

७. जाहिरातीत नमूद केलेल्या पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.mahast.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

८. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

९. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१०. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी (Mobile)अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

११. शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/ प्र.क्र.६८/ क्रि.युसे-२, दि.३.४.२००५ मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्याची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

१२. विजा-अ,भज-ब,भज-क,भज-ड या प्रवर्गाकरीता विहीत केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतरपरिवर्तनीय आहे. सदर उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमेलेअर दाखला) अद्ययावत असणे आवश्यक आहे.

अ) इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या मागासप्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या वेळी व अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी वैध असलेले सादर करणे आवश्यक आहे.

ब) इमाव, भज-क व भज-ड आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट ) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

क) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या- त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील.

१३. मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर,२०११ नुसार आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधीत उमेदवाराची जबाबदारी राहील.

**१४.** लेखी परीक्षेतील सांकेतांक क्रमांक-१ व २ मधील उमेदवारास गुणानुक्रमे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीच्यावेळीस व वर्ग-२ (वरिष्ठ) व (कनिष्ठ) पदातील उमेदवारासं नेमणूक देण्यापुर्वी कागदपत्र तपासणी करतांना शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, अनुभव, समांतर आरक्षणासंबंधी, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या मूळ व साक्षांकित प्रती (Attested copies) या केंद्र / राज्यशासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक यांच्याकडून साक्षांकित करुन अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**१५.** जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना रा.प. महामंडळाच्या आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार नेमणूका देण्यात येतील. भविष्यात जस-जशा जागा रिक्त होतील त्याप्रमाणे नेमणुका देण्यात येतील.

१६. सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवत आहे.

**महाव्यवस्थापक (क.व.औ.स)**

महाराष्ट्र नागरी सेवा **(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)** नियम, २००५ नुसार

**(नमुना - अ)**

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री./श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------------------ श्री. ----------------------------------------------------------यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय -------------------- वर्षे, राहणार ----------------------------------------------------------याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी -------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ----------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक:- सही

**********

## रा.प.महामंडळातील अधिकारी यांचेकरीता सरळसेवा लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम

| अ. क्र. | विषय | एकूण प्रश्न संख्या | एकूण गुण | माध्यम | परिक्षेचा कालावधी | प्रश्न पत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | २५ | ५० | मराठी | ९० मिनिटे ( दीड तास) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न प्रत्येक प्रश्नास २ गुण |
| २ | इंग्रजी | २५ | ५० | इंग्रजी | | |
| ३ | सामान्यज्ञान | २५ | ५० | मराठी | | |
| ४ | बौध्दिक क्षमता चाचणी | २५ | ५० | मराठी | | |
| | एकूण | १०० | २०० | | | |

**अभ्यासक्रम**

अ) ज्या पदाकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे, अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील, फक्त मराठी हया विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमीक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२) च्या दर्जाच्या समान राहील.

**१) सामान्यज्ञान**

अ) चालू घडामोडी- जागतिक तसेच भारतातील राजकीय, औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व भौगोलीक क्षेत्रातील चालू घडामोडी.

ब) महाराष्ट्रातील शहरी व ग्रामिण भागातील पायाभूत सुविधांचा विकास (परिवहन, सार्वजनिक/खाजगी वाहतूक व्यवस्था,ऊर्जा, दळणवळण- टीव्ही, इन्टरनेट, पोष्ट दूरसंचार ) इ.बाबतचे ज्ञान

क) भारतीय राज्य घटना तसेच राज्य विधिमंडळाबाबतचे प्राथमिक ज्ञान

ड) महाराष्ट्राचा भूगोल - रचानात्मक विभाग, हवामान पर्जन्यमान, तपमान, नद्या, पर्वत, डोंगर ,पूल, नैसर्गिकवने, खनिजे, अक्षांश रेखांश इ.बाबतचे ज्ञान.

इ) सांस्कृतिक - महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, यात्रा, तीर्थक्षेत्रे, कुंभमेळा, राष्ट्रीय सण मराठी कालगणना इ.बाबतचे ज्ञान

ई) महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था-आधुनिकीकरण, जागतिकीकरण, अर्थव्यवस्थेसंबंधी प्रश्न जसे मंदी, बेरोजगारी, गरीबी, महागाई दुष्काळ, वाढती लोकसंख्या

उ) संगणक माहिती व तंत्रज्ञान- आधुनिक समाजातील संगणकाचा वापर, शासकीय / निम शासकीय क्षेत्रातील संगणकीकरण, शासनाचे कार्यक्रम, जसे, ई-गव्हर्नस एक खिडकी योजना,

**२) इंग्रजी-**

अ) उता-यावरील प्रश्न

ब) व्याकरण

**३) मराठी**

ओ) मराठी भाषा - व्याकरणासंबंधी प्रश्न,

४) **बौध्दिकचाचणी**

अ) अंकगणित - दशांश अपूर्णांक, घातांक, वर्गमूळ, टक्केवारी, गुणोत्तर, सरासरी, कामकाळवेग,नफातोटा

ब) बौध्दिक क्षमता चाचपणी विषयक प्रश्न.

*******